# शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

जलंब रोड, खामगांव-444303, जि. बुलडाणा (महाराष्ट्र राज्य)
Phone No.- (07263) 252278,256644 E-mail:- office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in

## विद्यार्थ्यांकरीता सुचना

क्र : शातनिखा/शिष्य.वि /2023-24/2529
दिनांक 0 3 NOV 2023

संदर्भः- मा.सहसंचालक,तंत्रशिक्षण अंमरावती यांचे पत्र क्र
विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२३/२९४७ दिनांक २३/१०/२०२३

वरिल संदर्भान्वये, संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता महाडीबीटी पोर्टलवर** तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या **राजश्री शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा** लाभ घ्यावयाचा आहे त्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटीवर आपले शिष्यवृत्ती बाबतचे अर्ज (नविन/नुतनीणकरण) भरण्याची प्रक्रिया **दिनांक ११.१०.२०२३ पासून** सुरु झालेली आहे.तरी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी डीबीटी पोर्टलवर अर्ज (नविन/नुतनीणकरण) लवकरांत लवकर भरुन आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयात सादर करावे.

(डॉ.एस.एस.प्रभुणे)
प्राचार्य
शासकीय तत्रनिकेतन, खामगांव

**प्रतिलीपीः- माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव**

१.मुख्य सुचना फलक
२.मुलांचे व मुलींचे वसतीगृहातील सुचना फलक
३. सर्व विभागप्रमुख-संगणक अभि./अणुविद्युत अभि/विद्युत अभि/स्थापत्य अभि/यंत्र अभि.
४.प्रोग्रामर यांना संस्थेच्या वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता

टिपः-१.पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाच्या प्रिंटसह आवश्यक कागदपत्रे कार्यालयात सादर करावेत जर विद्यार्थ्यांनी अर्ज संस्थेत सादर न केल्यास त्याकरीता होणा-या नुकसानास संस्था जबाबदार राहणार नाही. याबाबतची संबंधीतांनी नोंद घ्यावी.
२. संस्थेत TFWS व NON CAP अंतर्गत संस्था स्थरावर प्रवेशीत विद्यार्थ्यांना नियमानुसार कुठलीही शिष्यवृत्ती लागू नसल्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती करीता अर्ज करु नये.
३. विद्यार्थ्याने Mahadbt या संकेतस्थळावर अर्ज भरल्यानंतर आपला युजर आयडी व पासवर्ड जतन करुन ठेवावा. तसेच तो स्वत: वेळोवेळी लॉगीन करुन अर्जाची स्थिती पाहणे, अर्जत्रुटी मध्ये आल्यास त्रुटीची पुर्तता करुन पुन्हा RE-APPLY करण्याची विद्यार्थ्यांची राहील.
**४. पात्र विद्यार्थ्यांनी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व महाराष्ट्र शासनाच्या (DBT Portal) पोर्टवरील शिष्यवृत्ती या योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेसाठी अर्ज सादर करावा.**